राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अतुलनीय कामगिरी केलेल्या वयोवृध्द खेळाडूंना मानधन करिता निधी वितरित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांक : पुरवणी ३२१७ /प्र.क्र १४२ /क्रीयुसे -२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख : २६ मार्च, २०१८.

वाचा

१. शासन निर्णय समाजकल्याण सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक - सेनिवे -१०९१ / प्र.क्र.८२/क्रीयुसे -१,दिनांक १० जून, १९९३.

२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग , शासन निर्णय क्रमांक क्रीडायो २०१२/प्र. क्र.६४/१२ /क्रीयुसे-२, दि. २१ डिसेंबर, २०१२

३. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं - २०१७ / प्र.क्र ९४ /अर्थ-३ ,दि.०६.०२.२०१८.

४. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा,पुणे यांचे पत्र क्र. वयोखेमानधन/ निधी वितरण/ २०१७-१८ /का-६ /२६७; दि.१६.०१.२०१८

प्रस्तावना -

राज्य / राष्ट्रीय / आंतरराराष्ट्रीय स्तरावर अतुलनीय कामगिरी केलेल्या वयोवृध्द खेळाडूंना मानधन देण्याची योजना दि.१० जून, १९९३ च्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित करण्यात आली आहे. उपरोक्त संदर्भ क्र.०२ च्या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय / आंतरराराष्ट्रीय स्तरावर अतुलनीय कामगिरी केलेल्या वयोवृध्द खेळाडूंना तसेच किताब प्राप्त कुस्तीगिरांना सुधारित मासिक मानधन देण्यात येते.

उपरोक्त संदर्भाधीन क्र.०४ च्या पत्रान्वये सन २०१७-१८ या वर्षा करीता मानधन अदा करण्यासाठी निधी वितरीत करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. त्या अनुषंगाने या योजनेतंर्गत सन २०१७-१८ च्या हिवाळी अधिवेशनाममध्ये पुरवणी मागणीद्वारे रू.३६.५७ लक्ष इतक्या अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या निधीच्या वितरणास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०१७-१८ या वर्षाकरीता राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केलेल्या नामवंत खेळाडूंना मानधन देण्याकरिता सुधारीत अंदाजानुसार रु.६३.५७ लक्ष इतका निधी अर्थसंकल्पित असून यापैकी रु.२७.००लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. उर्वरीत रु.३६.५७ लक्ष (रुपये छत्तीस लाख सत्तावन्न हजार फक्त) इतका निधी वितरीत करण्यास प्रशास्कीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर निधी आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या अधिनस्त ठेवण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त संदर्भात होणारा खर्च “मागणी क्र.ई-३,२२०४-क्रीडा व युवक सेवा-१०४ क्रीडा व खेळ (०८)(०२) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केलेल्या नामवंत खेळाडूना मानधन (२२०४ १६५८), ३१ सहायक अनुदाने वेतनेतर” या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा. सदरचे अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहेत त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावे.

३. सदर योजनेअंतर्गत वयोवृध्द खेळाडूंना मानधन मंजूर करतांना संदर्भाधीन क्र.१ च्या शासन निर्णयामधील मधील अटी व शर्ती लागू राहतील.

४. वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.०६.०२.२०१८ च्या परिपत्रकातील सूचनानुसार उपरोक्त तरतूद खर्च करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. यासाठी संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी/ लेखाधिकारी, पुणे यांना आंहरण व संवितरण अधिकारी तर आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ.सं.क्र. २५५/१८/व्यय-५; दि. २८.०२.२०१८ अन्वये वितरीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२७१००५५६७३२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.27 10:07:25 +05'30'

(राजेंद्र पवार)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा यांचे खाजगी सचिव
२) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे.
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
५) महालेखापाल (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
६) वरीष्ठ कोषागार अधिकारी, पुणे (क्रीडा संचालनालयामार्फत).
७) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, (क्रीडा संचालनालयामार्फत).
८) सर्व उप संचालक, क्रीडा व युवक सेवा, (क्रीडा संचालनालयामार्फत).
९) सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी, (क्रीडा संचालनालयामार्फत)
१०) वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई.
११) उप सचिव (क्रीडा)/ अवर सचिव (क्रीयुसे २ व ३) / कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), शा.शि.व क्री.वि., मंत्रालय, मुंबई.
१२) निवडनस्ती, क्रीयुसे-२